प्रकरण चौथे :

## सभासदांच्या माहितीचे संश्लेषण व स्पष्टीकरण

प्रास्ताविक :

सांगली जिल्ह्यातील नांद्रे हे गांव सांगलीच्या अुत्तरेस ११ कि. मी. अंतरावर आहे. बारमाही वाहणा-या कृष्णा नदीमुळे नांद्रे गावाचे नंदनवन झाले आहे. या गावातील काही व्यक्तींनी स्वत:च्या हिंमतीवर, तर काही व्यक्तींनी सहकार तत्वावर नदीतून शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा संस्था निर्माण केलेल्या आहेत. जिल्ह्यात सर्वात अधिक पाणीपुरवठा संस्था असणारे हे गांव आहे. काळी जमीन आणि उत्तम हवामान यामुळे येथे उस, सोयाबीन, गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला इत्यादी पीके घेतली जातात. योग्य रासायनिक खतांचा पुरवठा आणि तज्ञ शेती अधिका-यांचा सल्ला यामुळे गावातील शेती - व्यवसाय प्रगतीपथावर आहे.

शेतीक्षेत्रामध्ये नांद्रे गावाची जी चौफेर प्रगती झालेली आहे, त्यामागे या गावातील सहकारी पत पुरवठा संस्था, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका आणि अनेक सहकारी संस्था यांचा वाटा मानावा लागेल. या सुजलाम गावातील शेतक-यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत असताना या शेतक-यांना नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेपासून जे काही योगदान मिळालेले आहे, त्याबाबतची अभ्यास व पहाणी करणे आवश्यक वाटले. यासाठी १०० शेतकरी सभासदांचा जो नमुना निवडण्यात आलेला आहे, त्यानुसार ही माहिती देत आहे.

## ४.१ सभासदांच्या वयोमानानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्र ४.१

सभासदांच्या वयोमानानुसार वर्गीकरण

| वयवर्षे | सभासदांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २१ ते ३० | ०१ | ०१ |
| ३१ ते ४० | २२ | २२ |
| ४१ ते ५० | ३१ | ३१ |
| ५१ ते ६० | १९ | १९ |
| ६१ ते ७० | २० | २० |
| ७१ पुढील | ०७ | ०७ |
| एकूण | १०० | १०० |

कोष्टक क्रमांक ४.१ मध्ये नांद्रे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मधील १०० सभासदांचे वयोमानानुसार वर्गीकरण दर्शविते. ४१ ते ५० वयोगटातील सभासदांची संख्या ३१ टक्के इतकी आहे. याचा अर्थ शेतीबाबतचे दीर्घ अनुभव असणाऱ्या सभासदांची संख्या जास्त आहे. केवळ ७ टक्के शेतकरी सभासद हे ७० वर्षे ओलांडलेले आहेत. याचा अर्थ ते शेती व्यवसायातून निवृत्त होत आहेत.

एकूण सभासदांपैकी १०० टक्के सभासद हे विवाहित आहेत.

## ४.२ सभासदांच्या गावानुसार [स्थानानुसार] वर्गीकरण :

**कोष्टक क्रमांक ४.२**

**सभासदांच्या गावानुसार वर्गीकरण**

| गावाचे नांव | वर्गीकरण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नांद्रे | ८५ | ८५ |
| नावरसवाडी | १५ | १५ |
| एकूण | १०० | १०० |

या सहकारी संस्थेमध्ये नांद्रे व नावरसवाडी या दोन गावातील शेतक-यांना समावेश करण्यात आलेला आहे. जवळ जवळ ८५ टक्के सभासद हे नांद्रे गावातील आहेत, तर नांद्रे गावालगत असलेल्या नावरसवाडी गावामधील सभासदांची संख्या १५ टक्के आहे. याचाच अर्थ, नांद्रे गावातील शेतजमीनीचे व लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे.

## ४.३ सभासदांच्या जातीधर्मानुसार वर्गीकरण :

नांद्रे गावामध्ये सर्व जाती जमातीचे लोक राहात असल्यामुळे गावातील कोणत्याही सहकारी संस्थेमध्ये सर्व जातींच्या लोकांचा समावेश असतो.

## कोष्टक क्रमांक ४.३

## सभासदांचे जातीनुसार वर्गीकरण

| | जात | सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | ४ | ४ |
| | धनगर | २ | २ |
| | महार | ५ | ५ |
| | मांग | २ | २ |
| | चांभार | २ | २ |
| | रामोशी | १ | १ |
| | तेली | १ | १ |
| | लिंगायत | ६ | ६ |
| | मराठा | १४ | १४ |
| २. | जैन | ५८ | ५८ |
| ३. | मुसलमान | ५ | ५ |
| | एकूण | १०० | १०० |

वरील कोष्टकावरून असा अर्थ काढता येईल की नमुन्यातील १०० सभासदांपैकी १७ टक्के सभासद अनुसुचित जाती जमातीचे आहेत. तर १४ टक्के सभासद मराठा आणि ५८ टक्के जैन सभासद आहेत. तर फक्त ५ टक्के सभासद हे मुसलमान आहेत.

## ४.४ सभासदांच्या शिक्षणानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.४

सभासदांचे शिक्षणानुसार वर्गीकरण

| शिक्षण | एकूण | प्रमाण |
|---|---|---|
| प्राथमिक | ३९ | ३९ |
| माध्यमिक | ४० | ४० |
| महाविधालयीन | १३ | १३ |
| निरक्षर | ८ | ८ |
| एकूण | १०० | १०० |

जवळ जवळ ७९ टक्के सभासद हे माध्यमिक शाळेपर्यन्त शिक्षण घेतलेले आहेत. तर फक्त आठ टक्के सभासद हे निरक्षर आहेत. पदवी व निरक्षरतेचे प्रमाण फारच अल्प आहे.

## ४.५ सभासदांचे भाग भांडवलानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.५

सभासदांचे भागभांडवलानुसार वर्गीकरण

| भागभांडवल [रुपयात] | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ते ५०० रु. पर्यन्त | ४३ | ४३ |
| ५०१ ते १००० | १२ | १२ |
| १००१ ते २००० | १६ | १६ |
| २००१ ते ३००० | १० | १० |
| ३००१ ते ४००० | ५ | ५ |
| ४००१ ते ५००० | ३ | ३ |
| ५००१ ते ६००० | ३ | ३ |
| ६००१ ते ७००० | ३ | ३ |
| ७००० पुढील | ५ | ५ |
| एकूण | १०० | १०० |

कोष्टक क्रमांक ४.५ मध्ये नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे भागभांडवलानुसार सभासदांचे वर्गीकरण दर्शविते. १००० रुपया पर्यन्त भाग भांडवल असणाऱ्या सभासदांची संख्या ५५ टक्के इतकी आहे. तर ३००१ रुपयापुढील भागभांडवल असणाऱ्या सभासदांची संख्या फक्त १९ टक्के आहे.

## ४.६ सभासदांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.६

सभासदांच्या कुटुंबप्रकारानुसार वर्गीकरण

| कुटुंबाचा प्रकार | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| एकत्र | ६७ | ६७ |
| विभक्त | ३३ | ३३ |
| एकूण | १०० | १०० |

एकूण सभासदांपैकी ३३ टक्के कुटुंबांनी विभक्त किंवा स्वतंत्र कुटुंबपध्दतीचा स्वीकार केलेला आहे. तर ६७ टक्के सभासद हे एकत्र कुटुंब पध्दतीत राहतात.

## ४.७ सभासद कुटुंबाचा शेती पुरक व्यवसायानुसार वर्गीकरण :

**कोष्टक क्रमांक ४.७**

सभासद कुटुंबाचा शेतीपुरक व्यवसायानुसार वर्गीकरण

| प्रकार | सभासद संख्या | शेकडा प्रकार |
|---|---|---|
| शेती | १३ | १३ |
| शेती व कुक्कुटपालन | १ | १ |
| शेती व पशुपालन | ८० | ८० |
| शेती, कुक्कुटपालन व पशुपालन | ६ | ६ |
| एकूण | १०० | १०० |

कोष्टक क्रमांक ४.७ हे शेती पुरक व्यवसायाबाबतचे वर्गीकरण दर्शविते. नमुन्यातील १०० सभासदापैकी ८० टक्के सभासद हे शेती व शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालनाचा व्यवसाय करतात. याचाच अर्थ शेतकरी हे शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्यांची संख्या जास्त आहे, तर फक्त १३ टक्के सभासद फक्त शेती हाच व्यवसाय करतात. तर पशु पालनाशिवाय इतर शेती पुरक व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी आहे.

## ४.८ मागासवर्गीय व इतरवर्गीय सभासदांचे वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.८

मागासवर्गीय व इतर वर्गीय सभासदांचे वर्गीकरण

| प्रकार | सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मागासवर्गीय | १७ | १७ |
| इतरवर्गीय | ८३ | ८३ |
| एकूण | १०० | १०० |

एकूण १०० सभासदांपैकी १७ टक्के सभासद हे मागासवर्गीय जातीचे आहेत, तर ८३ टक्के सभासदांमध्ये ५८ टक्के सभासद जैन, १४ टक्के सभासद मराठा समाजाचे तर ५ टक्के सभासद हे मुसलमानधर्माचे आहेत.

## ४.९ सभासद कुटुंबातील पुरूषांच्या व स्त्रीयांच्या वयोमानानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.९

सभासद कुटुंबातील पुरूष व स्त्रीयांच्या वयोमानानुसार वर्गीकरण

| वयवर्षे | पुरूषांची संख्या | शेकडाप्रमाण | स्त्रीयांचीसंख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १० पर्यन्त | ४९ | १६.८३ | ३२ | १२.९५ |
| ११ ते २० | ६० | २०.६१ | ५१ | २०.६४ |
| २१ ते ३० | ५२ | १७.८६ | ५८ | २३.४८ |
| ३१ ते ४० | ४८ | १६.४९ | ४१ | १६.५९ |
| ४१ ते ५० | ३९ | १३.४० | ३० | १२.१४ |
| ५१ ते ६० | २० | ६.८७ | २० | ८.१० |
| ६१ पुढील | २३ | ७.९० | १५ | ६.०७ |
| एकूण | २९१ | १००.०० | २४७ | १००.०० |

वरील कोष्टकामध्ये सभासद कुटुंबामधील वयोमानानुसार स्त्रीयांचे व पुरुषांचे प्रमाण दर्शविते. सभासद कुटुंबातील पुरुषांचे व स्त्रीयांचे ४० वयोमानापर्यन्तचे प्रमाण ७२ टक्के इतके आहे, तर २० ते ४० वयोमानापुढील वयोगटातील प्रमाण २८ टक्के इतके आहे. २०ते ४० वयोगटातील पुरुषांचे प्रमाण ३४.३५ टक्के इतके आहे, तर स्त्रीयांचे प्रमाण ४०.०७ टक्के आहे.

४.१० सभासद कुटुंबातील स्त्री व पुरुषांचे शिक्षणानुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.१०

सभासद कुटुंबातील स्त्री व पुरुषांचे शिक्षणानुसार वर्गीकरण

| शिक्षण | पुरुष | स्त्रीया | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| निरक्षर | २१ | ५१ | ७२ | १३.३८ |
| प्राथमिक | ६४ | ६५ | १२९ | २३.९७ |
| माध्यमिक | १२५ | ११३ | २३८ | ४४.२३ |
| महाविद्यालय | ७१ | १३ | ८४ | १५.६१ |
| अद्याप शाळेत जात नाहीत | १० | ५ | १५ | २.७८ |
| एकूण | २९१ | २४७ | ५३८ | १००.०० |

१०० सभासद कुटुंबामधील ६८ टक्के स्त्रीया व पुरुष हे प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये शिक्षण घेतलेले आहेत. तर महाविद्याला-

पर्यन्त शिक्षण घेतलेल्या पुरुषांचे प्रमाण २४.३९ टक्के इतके आहे. आणि स्त्रीयांचे प्रमाण फक्त ५.२७ इतके आहे. प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेतलेल्या स्त्रीयांचे व पुरुषांचे प्रमाण समान आहे.

## ४.११ सभासद कुटुंबाच्या आकारमानानुसार वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.११

| कुटुंबाचे आकारमान | एकूण कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | १ | १ |
| २ | १ | १ |
| ३ | १० | १० |
| ४ | २५ | २५ |
| ५ | २७ | २७ |
| ६ | ११ | ११ |
| ७ | ९ | ९ |
| ८ | ५ | ५ |
| ९ | ७ | ७ |
| १० | २ | २ |
| ११ | - | - |
| १२ | १ | १ |
| १३ | - | - |
| १४ | १ | १ |
| एकूण | १०० | १०० |

७५% सभासद कुटूंबाचे आकारमान लहान म्हणजे ६ किंवा ६ पेक्षा कमी व्यक्तीचे आहे. तर फक्त २५% सभासद कुटूंबाचे आकारमान ६ पेक्षा जास्त व्यक्तीचे आहे.

## ४.१२ सभासदाच्या स्वत:च्या मालकीचे बागायत व जिराईत शेतीचे प्रमाण :

कोष्टक क्र. ४.१२

स्वत:च्या मालकीचे बागायत व जिराईत शेती प्रकारानुसार वर्गीकरण

| क्षेत्र [जमिन] [एकर] | बागायत शेती [एकर] | जिराईत शेती [एकर] |
|---|---|---|
| १ एकर पेक्षा कमी | ८ | १० |
| १ ते ५ पर्यंत | ५५ | ३४ |
| ५ ते १० पर्यंत | ३१ | - |
| ११ ते १५ पर्यंत | ३ | - |
| १५ पुढील | ३ | - |
| एकूण [एकर] | १०० | ४४ |

निवडलेल्या १०० सभासदापैकी, सर्वच सभासद हे बागायत शेती करणारे आहेत. शेतीच्या प्रकारानुसार वर्गीकरण केले असता १ एकर ते ५ एकर जमीन असणाऱ्या सभासदाची संख्या ५५ इतकी आहे. याचा अर्थ ५० पेक्षा जास्त सभासदाची जमिनी ५ एकरापर्यंत आहेत. तर ५ ते १० एकरापर्यंत असणाऱ्या सभासदाची संख्या ३१ इतकी आहे.

माञ सभासदाचे जिराईत शेती क्षेत्राचे प्रमाण फारच अल्प आहे. जिराईत शेतामध्ये हरभरा व शाळू हे दोनच पिक घेतले जातात.

## ४.१३ सभासदाच्या बागायत पीक प्रकारानुसार शेती वर्गीकरण :

नमुन्यातील १०० सभासद हे पुर्णपणे बागायत शेती करणारे शेतकरी आहेत. या शेतामध्ये ऊस, सोयाबीन, गहू ही प्रमुख पीक घेतली जातात. शेतकरी खरीप हंगामामधील सोयाबीन काढून ऊस किंवा गव्हाचे पीक घेतात.

### बागायत शेती प्रकारानुसार जमीनीचे वर्गीकरण

कोष्टक कृमांक ४.१३

| तपशिल [जमीन] [एकरामध्ये] | ऊस [एकर] | शेकडा प्रमाण | सोयाबिन [एकर] | शेकडा प्रमाण | गहू [एकर] | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ एकरापेक्षा कमी | २ | ४ | ७ | १२.९६ | ६ | ४०.०० |
| १ ते ३ पर्यंत | ३१ | ६२ | ३१ | ५७.४० | ८ | ५३.३३ |
| ३ ते ६ पर्यंत | १३ | २६ | ९ | १६.६६ | १ | ६.६६ |
| ६ ते ९ पर्यंत | ३ | ६ | ६ | ११.११ | – | |
| ९ पुढील एकर | १ | २ | १ | १:८५ | – | |
| एकूण | ५० | १०० | ५४ | १०० | १५ | १०० |

वरील कोष्टकात बागायत शेतीमधील ऊस, सोयाबीन आणि गव्हाचे क्षेत्रानुसार वर्गीकरण दर्शविले आहे. १ ते ३ एकरापर्यंत उसाचे क्षेत्र असणा-या सभासदांची संख्या ६२ टक्के आहे. तर ६ एकरापुढील उसाचे क्षेत्र फक्त ८ टक्के इतके आहे. तसेच १ ते ३ एकरापर्यंत सोयाबीन क्षेत्र ५७.४० टक्के आहे. तर गव्हाचे एकूण क्षेत्रापैकी ५३.३३ टक्के आहे. याचाच अर्थ ऊस व सोयाबीन पिकाचे क्षेत्र १ ते ३ एकरापर्यंत जास्त आहे.

४.१४ सभासदांच्या जिराईत पीकानुसार शेतीच्या आकाराचे वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.१४

जिराईत पीकानुसार शेतीचे वर्गीकरण

| तपशील शेती क्षेत्र [एकर] | गहू सभासद संख्या | शेकडा प्रमाण | हरभरा सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १एकरापेक्षा कमी | ५ | २५ | ५ | २०.८३ |
| १ ते ३ एकर पर्यन्त | १५ | ७५ | १९ | ७९.१६ |
| ३ एकरापुढील | – | | – | |
| एकूण | २० | १०० | २४ | १००.०० |

कोष्टक क्रमांक ४.१३ वरुन एकूण बागायत शेती आकाराच्या तुलनेने जिराईत शेती आकाराचे प्रमाण अल्पच आहे. सभासद फक्त शाळू. व हरभरा ही दोनच पीके घेत असतात. वरील कोष्टकावरुन असा अर्थ काढता येईल की, १ ते ३ एकरापर्यन्त हरभरा व शाळू उत्पादन करणा-यांची संख्याच जास्त आहे.

४.१५ फळे व भाजीपाल्यानुसार शेतजमीनीचे वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.१५

फळे व भाजीपाल्यानुसार शेतजमीनीच्या आकारमानानुसार वर्गीकरण

| क्षेत्र | फळे | भाजीपाला |
|---|---|---|
| १एकरापेक्षाकमी | २ | १ |
| १ते३ एकर | – | २ |
| एकूण | २ | ३ |

नमुन्यातील १०० सभासदांपैकी फक्त १ ते २ टक्केच शेतकरी फळे व भाजीपाल्याचे उत्पादन करीत असतात. याचाच अर्थ हवामानातील होणारा बदल, योग्य बीयाण्यांचा अभाव, आणि या पीकाबाबतच्या अभ्यासाचा अभाव ही कारणे यासंदर्भात सांगता येतील.

४.१६ सभासदांनी बागायत पीकावर केलेला खर्च त्यातून मिळणारे उत्पादन व नफा याचे वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.१६

बागायतपीकावर केलेला खर्च – उत्पन्न–नफा याचे वर्गीकरण

| एकण खर्च–उत्पन्न नफा [रूपयात] | सभासद संख्या खर्च | शेकडा प्रमाण | सभासदांचे उत्पन्न | शेकडा प्रमाण | नफा सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १०००० पर्यन्त | २५ | २८.४० | ११ | १२.५ | ११ | १२.५ |
| १०००१ ते २५००० | २० | २२.७२ | १० | ११.३६ | १६ | १८.१८ |
| २५००१ ते ५०००० | २० | २२.७२ | १० | ११.३६ | २१ | २३.८६ |
| ५०००१ ते ७५००० | १४ | १५.८८ | १६ | १८.१८ | ९ | १०.२२ |
| ७५००१ ते १००००० | ३ | [illegible] | ७ | ७.९५ | ११ | १२.५० |
| १००००१ ते १२५००० | ४ | ४.५४ | ५ | ५.६८ | ५ | ५.६९ |
| १२५००१ ते १५०००० | – | – | ५ | ५.६८ | ७ | ८.९५ |
| १५०००१ ते १७५००० | १ | १.३६ | ७ | ७.९५ | ३ | ३.४० |
| १७५००१ ते २००००० | – | – | ७ | ७.९५ | २ | २.२७ |
| २००००० पुढील | १ | १.३६ | १० | ११.३६ | ३ | ३.४० |
| एकूण | ८८ | ९८ | ८८ | १०० | ८८ | १००.०० |

नमुन्यातील १०० सभासदांची जमीन ओलीताखाली असल्यामुळे सर्वच शेतकरी ऊस, सोयाबीन व गव्हाचे उत्पादन घेत असतात. सरासरी ३ ते ५ एकर जमीन असणा-या सभासदांची संख्या जास्त असल्यामुळे नगदी पीकाचे उत्पादन घेतात. शेतकरी सभासदांचे एकूण क्षेत्रापैकी काही क्षेत्र ऊसाचे व काही क्षेत्र सोयाबीनचे असल्यामुळे या पीकावर कराव्या लागणा-या खर्चामध्ये ५०,०००रु.पर्यन्त खर्च करणा-या सभासदांची संख्या ७४ टक्के इतकी आहे. वरील कोष्टकात एकूण उत्पादनामधून एकूण खर्च वजा करुन नफा काढलेला आहे. तसेच एकलाखरुपयांपर्यन्त शेती उत्पन्नासाठी खर्च करणा-या सभासदांची संख्या ९३ टक्के आहे. तर १ लाख रुपयांपर्यन्त शेतीतून उत्पन्न काढणा-या सभासदांची संख्या शेकडा ६१.३४ म्हणजे उत्पन्ना पेक्षा खर्च कमी असणा-या सभासदांची संख्या जास्त आहे. ३८.५५ टक्के सभासदांचे शेती उत्पन्न १लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.. शेती उत्पन्नातून शेती खर्च वजा जाता १ लाख रुपयांपर्यंत नफा मिळविणा-या सभासदांची संख्या ७७.२६ टक्के इतकी आहे.

४.१७ सभासदांच्या जिराईत पीकावर केला खर्च त्यातून मिळणारे उत्पन्न व नफा यांचे वर्गीकरण :

कोष्टक क्र. ४.१७ पुढीलपानावर

## कोष्टक क्रमांक ४.१७

### सभासदांच्या जिराईत पीकावर केलेला खर्च, मिळणारे उत्पन्न व नफा याचे वर्गीकरण

| जीराईतपीका साठी[रक्कम] | एकुण खर्च | शेकडा प्रमाण | एकूण उत्पन्न | शेकडा प्रमाण | एकुण नफा | शेकडा प्रमाण | तोटा | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १000 रु. पर्यन्त | १५ | ३४.०९ | २ | २.२७ | ५ | १२.१९ | २ | ६६.६६ |
| १००१ ते ३००० | १५ | ३४.०९ | १० | २२.७२ | १२ | २९.२६ | १ | ३३.[illegible]३ |
| ३००१ ते ६००० | १० | २२.७२ | १३ | २९.५४ | १२ | २९.२६ | – | " |
| ६००१ ते ९००० | २ | ४६५४ | ५ | ११.३६ | ५ | १२.१९ | – | – |
| ९००१ ते १२००० | १ | २.२७ | ७ | १५.९० | ३ | ७.३१ | – | – |
| १२००१ पुढील | १ | २.२७ | ७ | १५.९० | ४ | ९.७५ | – | – |
| एकूण | ४४ | १००.०० | ४४ | १००.०० | ४१ | १००.०० | ३ | १००.०० |

वरील कोष्टकात एकूण जिराईत पीक उत्पन्नामधून खर्च वजा जाता सभासदांना मिळणारा नफा व तोटा काढलेला आहे. एकूण खर्चामध्ये १००१ ते ३००० रुपयापर्यन्त खर्च करणाऱ्यांची संख्या ३४.०९ टक्के इतकी आहे. तर ३००१ ते ६००० रुपयांपर्यन्त उत्पन्न काढणाऱ्या सभासदांची संख्या शेकडा प्रमाण २९.५० इतके आहे. आणि १००१ ते ६००० रुपया पर्यन्त नफा मिळविणाऱ्या सभासदांचे प्रमाण ५४.२२ टक्के आहे. फक्त तीन सभासदांनाच जिराईत पिकांपासून तोटा झालेला आहे.

## ४.१८ सभासदांच्या पशुपालन विषयी वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.१८

पशुपालनाचे वर्गीकरण

| संख्या | बैल | रेडा | म्हैस | गाय | शेळी | कोंबडी |
|---|---|---|---|---|---|---|
| एक | ६ | ९ | २९ | १२ | ३ | – |
| दोन | ९ | ४ | ३३ | १ | १ | – |
| दोनपेक्षाजास्त | – | १ | १२ | – | – | १ |
| एकूण | १५ | १४ | ७४ | १३ | ४ | १ |

वरील कोष्टक क्रमांक ४.१८ मध्ये सभासदाच्या पशुपालनानुसार वर्गीकरणामध्ये २९ लोकांच्याकडे १ म्हैस आहे, ३३ सभासदांकडे दोन म्हैशी आहेत तर फक्त १२ सभासदांकडे दोन पेक्षा जास्त म्हैशी आहेत. कोंबडी पालनाचे प्रमार्ण फारच अल्प आहे.

## ४.१९ सभासदांना पशुपालनातून आलेला खर्च, उत्पन्न, तोटा याचे प्रमाण :

बागायत जमीनीचे प्रमाण अधिक असल्यामुळे बारमाही चारा मिळत असतो. जनावरांना लागणारा चारा आपल्या शेतजमिनीतून काढून दिला जातो. त्यामुळे शेतक-यांना चा-याचा प्रश्न कधीच निर्माण होत नाही. त्यामुळे चा-यावरील करावा लागणारा खर्च व स्वत:चे पशुपालनावरील करावा लागणारा खर्च वजा केला तर जास्तीत

जास्त सभासदांना नफा न होता तोटाच होतो हे पुढील कोष्टकावरून सांगता येईल.

**कोष्टक क्रमांक ४.१९**

पशुपालनासाठी करावा लागणारा खर्च,उत्पन्न,नफा-तोट्याचे प्रमाण

| पशुपालनासाठी [रक्कम] | उत्पन्न स.संख्या | शेकडा प्रमाण | खर्च स.संख्या | शेकडा प्रमाण | नफा स.संख्या | शेकडा प्रमाण | तोटा स.संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १००० पर्यंत | ३ | ४.०५ | १ | १.३५ | ५ | १९.२३ | २ | ४.१६ |
| १०००ते ५००० | ५ | ६.७५ | ४ | ५.४० | १२ | ४६.२५ | १८ | ३७.५० |
| ५०००ते१०००० | २० | २७.०२ | १६ | २१.६२ | ७ | २६.९२ | २८ | ५८.३३ |
| १००००ते१५००० | १७ | २२.९७ | १९ | २५.६७ | २ | ७.६९ | - | - |
| १५०००ते२०००० | १६ | २१.६२ | १२ | १६.२० | - | - | - | - |
| २०००० पुढील | १३ | १७.५६ | २२ | २९.७२ | - | - | - | - |
| एकूण | ७४ | १००.०० | ७४ | १००.०० | २६ | १००.०० | ४८ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असा अर्थ काढता येईल की जवळ जवळ ७४ टक्के व्यक्ती पशुपालनाचा व्यवसाय करतात. या व्यक्तींच्या जवळ म्हैस, गाय, रेडा, बैल याची संख्या जास्त आहे. त्यामुळे वर्षभरामध्ये कायमस्वरुपी उत्पन्न यातून मिळत नाही. श्रम व चारा वजा केले तर नफ्याच्या प्रमाणापेक्षा तोट्याचे प्रमाण अधिक असते. ५८.३३ टक्के शेतकऱ्यांना १ हजार रुपयांपासून दहा हजार रुपयांपर्यन्त तोटा झालेला आहे. तर ४६.१५ टक्के लोकांना ५००० रुपयापर्यन्त नफा झालेला आहे.

## ४.२० शेती अवजारे :

निवडलेल्या १०० सभासदांपैकी जवळ जवळ ८० टक्के सभासद हे लोखंडी व लाकडी अवजारांचा वापर करतात. कारण बागायत शेतीमध्ये या दोन्ही अवजारांचा वापर हा करावाच लागतो.

सभासदशेतक-यांची स्वतःची काही अवजारे आहेत, तर काही अवजारे दुस-यांकडून उसनवार व भाडेपट्टीवर घेतात. स्वत:ची अवजारे असणा-या सभासद सभासदांचीसंख्या फक्त १२ टक्के इतकी आहेत.

## ४.२१ स्त्री सभासद :

भारतामध्ये पुरुष प्रधान समाज व्यवस्था असल्यामुळे पुरूषांचा सहभाग सर्वचठिकाणी अग्रक्रमाने असतो. निवडलेल्या १०० सभासदांमध्ये ९५ टक्के सभासद हे पुरुष आहेत तर फक्त ५ टक्के स्त्री सभासद आहेत. या स्त्रीयांना पतीच्या निधनामुळे सभासद व्हावे लागले आहे. एकूण स्त्री सभासदांपैकी ३ टक्के सभासद हे अनुसुचित जाती जमातीचे आहेत.

स्त्री सभासदांना संस्थेमध्ये जात असताना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. त्यामध्ये व्यवस्थापकाशी बोलणे, आपली माहिती योग्य पध्दतीने मांडणे, कर्जासाठी कागदपत्रे तयार करणे. त्यामुळेच या संस्थेमध्ये स्त्री सभासदांचे प्रमाण फारच अल्प आहे.

## ४.२२ जलसिंचन सुविधा :

संपूर्ण सांगली जिल्ह्याचे लक्ष वेधून घेणारे आणि या गावातील सर्वात महत्वाचे क्षेत्र म्हणजे या गावातील जलसिंचन योजना होय.

गावापासून ४ ते ५ किमी. अंतरावरील कृष्णा नदीतून पाण्याचा उपसा करून संपूर्ण गावातील शेतजमीनीला पाणीपुरवठा या जलसिंचन योजना करीत आहेत. गावामध्ये १२ जलसिंचन योजना आहेत. त्यामुळे सभासद शेतकरी कोणत्याही एका जलसिंचन योजनेचा वापर करून शेतीला पाणी पुरवठ्याचा प्रयत्न केलेला आहे.

**कोष्टक क्रमांक ४.२०**

सभासद पाणीपुरवठा सोयीबाबतचे वर्गीकरण

| अ. नं. | योजनेचे नांव | स्थापना वर्ष | सभासद संख्या | दर एकरी कर्ज रुपये | कर्ज कोणा कडून घेतले |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृष्णाप्रसाद पाणी पुरवठा | १९६९ | २ | कर्जमुक्त | भूविकास बँक सांगली |
| २. | भाग्यलक्ष्मी | १९७२ | १ | कर्जमुक्त | सांगली बँक |
| ३. | वेळमाई पाणीपुरवठा संस्था | १९८२ | १ | ५००० | भूविकास सांगली |
| ४. | बिरदेव | १९८३ | ३ | ७००० | -"- |
| ५. | वसंत पाणीपुरवठा १ ते ३ | १९८३ | २२ | ७८०० | -"- |
| ६. | वसंत पाणीपुरवठा-४ | १९८४ | ७ | ५६०० | -"- |
| ७. | शेतकरी उपसा नं. १ | १९८३ | २० | ११८०० | -"- |
| ८. | शेतकरी उपसा नं. २ | १९८८ | ६ | १८५०० | -"- |
| ९. | विकास पाणीपुरवठा | १९९० | २५ | १७२०० | नांद्रे वि. का. स. सो. |
| १०. | जीवन पाणीपुरवठा | १९९० | २ | १४००० | भूविकासबँक |
| ११. | भाग्योदय[धडकयोजना] | १९७४ | १३ | - | म. रा. वि. महामंडळ |
| १२. | बाबासाहेब आंबेडकर संस्था | १९७४ | ५ | - | एकात्म समाज केंद्र |

४.२३ **कर्जासंबंधी :**

संस्थेचे सभासद होण्याची कारणे :

**कोष्टक क्रमांक ४.२१**

संस्थेचे सभासद होण्याचे कारणानुसार वर्गीकरण

| कारणे | सभासदसंख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| कर्जासाठी | ९४ | ९४ |
| बचतीसाठी | ६ | ६ |
| इतर कारणांसाठी | - | - |
| एकूण | १०० | १०० |

नांद्रे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्ये ९४ टक्के सभासद हे कर्ज मिळवण्यासाठी सभासद झालेले आहेत, तर फक्त ६ टक्के सभासद बचतीसाठी सभासद झालेले आहेत. बचतीचे प्रमाण अल्प असण्याचे कारण म्हणजे या बचतीवर मिळणारे व्याज इतर सहकारी बँकापेक्षा फारच कमी आहे.

४.२३.१ संस्थेकडून घेतलेले कर्जाबाबत :

एकूण सभासदापैकी ७७ टक्के सभासद कर्ज घेतात, तर यापैकी ६३ टक्के सभासद या संस्थेकडून तर इतर सभासद या संस्थेशिवाय इतर संस्थांकडून कर्ज घेतात. या नमुन्यातील १०० सभासदापैकी दोन्ही मार्गांनी कर्ज मिळवलेले आहे.

कोष्टक कृमांक ४.२२

संस्थेकडून मिळविलेल्या कर्जासंबंधी माहिती

| | |
|---|---|
| एकुण निवडलेले सभासद | १०० |
| संस्थेकडून कर्ज घेणारे सभासद | ६३ |
| एकूण सभासदांशी कर्ज घेण्याचे प्रमाण | ६३ टक्के |
| एकूण कर्ज रुपये | १७२६१०० |
| कर्ज घेणा-या सभासदांचे सरासरी कर्ज रुपये | २७३९८ |
| निवडलेल्या सभासदांचे कर्ज रुपये | १७२६१ |

कोष्टक कृमांक ४.२२ मध्ये सन १९९२-९३ मध्ये संस्थेकडून घेतलेल्या कर्जासंबंधी माहिती दिलेली आहे. निवडलेल्या सभासदांपैकी ६३ सभासदांनी या संस्थेकडून कर्ज घेतलेले आहे. कर्ज घेणा-या सभासदांचे सरासरी कर्ज रु.२७,३९८ रुपये आहे.

## कोष्टक क्रमांक ४.२४

संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या उपयोगीतेनुसार वर्गीकरण

| कर्जाचेकारण | सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| शेतीसाठी | ४० | ६३.४९ |
| म्हैस खरेदीसाठी | ५ | ७.९३ |
| शेती अवजारे व यंत्रे खरेदीसाठी | ३ | ४.७६ |
| पाणीपुरवठ्यासाठी | १५ | २३.८० |
| एकूण | ६३ | १००.०० |

नमुन्यातील १०० सभासदांपैकी ६३ सभासद हे या संस्थेकडून कर्ज घेतात. या सभासदांकडून कर्जाचा उपयोग पुढील कारणासाठी केलेला आहे. त्याचे प्रमाण शेतीसाठी ६३.४९% याचाच अर्थ पीक कर्जासाठी कर्जाचा उपयोग शेतकरी जास्त करतो. तर पाणीपुरवठ्यासाठी २३.८० टक्के कर्ज उपलब्ध झालेले आहे, तर ट्रॅक्टर, मळणी यंत्र इत्यादी अवजारे खरेदीसाठी दिलेले कर्ज फारच कमी आहे.

कोष्टक क्रमांक ४.२५ मध्ये सभासदांना दिलेल्या कर्जाच्या रकमांचे शेकडा प्रमाण दर्शविले आहे. याचा कोष्टकाचा अर्थ ४० हजार रुपयापर्यन्त ७७.७६ टक्के रक्कम दिलेली आहे., एक लाख रुपयांपुढील कर्जाचे प्रमाण फारच अल्प आहे. ५ हजार ते २०हजार रुपयांपर्यन्त सभासदांची संख्या जास्त आहे कारण असासाठी पीक

कर्ज म्हणून रक्कम दिलेली आहे. त्याचे प्रमाण ३६.५० टक्के आहे.

## कोष्टक क्रमांक ४.२५

## सभासदांच्या कर्जाचे प्रमाण

| कर्जाची रक्कम रुपये | सभासद संख्या | शेकडाप्रमाण |
|---|---|---|
| ५००० पर्यन्त | ११ | १७.४६ |
| ५००१ ते २०००० | २३ | ३६.५० |
| २०००१ ते ४०००० | १५ | २३.८० |
| ४०००१ ते ६०००० | ७ | ११.११ |
| ६०००१ ते ८०००० | १ | १.५८ |
| ८०००१ ते १००००० | - | - |
| १००००० पुढील | ६ | ९.५२ |
| एकूण | ६३ | १००.०० |

## कोष्टक क्रमांक ४.२६

## कर्जप्रकारानुसार वर्गीकरण

| कर्जप्रकार | सभासद संख्या | शेकडाप्रमाण |
|---|---|---|
| अल्पमुदत | ४० | ६३.४९ |
| मध्यममुदत | ८ | १२.६९ |
| दीर्घमुदत | १५ | २३.८० |
| एकूण | ६३ | १००.०० |

अल्पमुदत कर्जप्रकारामध्ये संस्था पीक कर्जासाठी रक्कम उपलब्ध करून देते. त्यामुळे त्याचे प्रमाण जास्त आहे. तर दीर्घ मुदतीमध्ये १३.८० टक्के रक्कम कर्ज दिलेले आहे. मध्यम मुदतीपेक्षा दीर्घमुदतीमध्ये कर्जरक्कम वाढ होण्याचे कारण म्हणजे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून या संस्थेच्या सहाय्याने विकास पाणी पुरवठा संस्थेला कर्ज दिलेले आहे.

**संस्थेव्यतिरिक्त अन्य मार्गाने सभासदांनी घेतलेले कर्ज :**

गावामध्ये एक राष्ट्रीयीकृत बँक, दोन सहकारी बँका, एक शेड्युल बँक, ५ नागरीपतसंस्था आहेत. तसेच अनेक खाजगी भिशी संस्था आहेत. त्यामुळे अनेक सभासद या संस्थेव्यतिरिक्त वरील संस्थांकडून कर्ज घेत असतात. एकूण निवडलेल्या १०० सभासदांपैकी ६५ टक्के सभासद हे अनेक संस्थांकडून कर्ज घेत असतात.

**कोष्टक क्रमांक ४.२७**

संस्थेव्यतिरिक्त अन्य मार्गांनी सभासदांनी घेतलेल्या कर्जाचेप्रमाण

| कर्जाचा मार्ग | सभासद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| इतर सह. बँका | ५४ | ६४.२८ |
| पतसंस्था | २० | २३.८० |
| भिशी | ८ | ९.५२ |
| नातेवाईक | २ | २.३८ |
| एकूण | ८४ | १००.०० |

निवडलेल्या १०० सभासदांपैकी ५४ सभासदांनी सहकारी बँकांकडून कर्ज घेतलेले आहे. त्याचे प्रमाण ६४.२८%इतके आहे. कारण सभासदांना पाणीपुरवठा, घरबांधणी, गोठा बांधणी, म्हैसखरेदी वाहन कर्ज इत्यादी कारणासाठी या बँका कर्ज देत असतात. काही सभासद वरील सर्व मार्गांचा वापर करीत आहेत. त्याचप्रमाणे २० ते २५ टक्के इतके आहे. नातेवाईकांकडून घेतलेल्या कर्जाचे प्रमाण फारच कमी आहे. त्याचे प्रमाण फक्त २.३८ इतके आहे.

४.२४ निवडलेल्या १०० सभासदांपैकी ९टक्के सभासद हे या संस्थेमध्ये बचत करतात. तर ९१ टक्के सभासद हे बचत करीत नाहीत. या संस्थां व्यतिरिक्त इतर ठिकाणी बचत केरण्याचे प्रमाण ५८ टक्के इतके आहे. याचाच अर्थ या संस्थांकडून मिळणारे व्याज दर इतर संस्थांकडून मिळणा-या व्याज दरापेक्षा फारच कमी आहे. बचतीच्या प्रकारानुसार ठेव बचत याचे प्रमाणही जास्त आहे:

४.२५ सभासदांच्या कर्जकारणांच्या थकबाकीनुसार वर्गीकरण :

कोष्टक क्रमांक ४.२६

थकबाकीकर्ज कारणानुसार वर्गीकरण

| कर्जाचे कारण | सभासदसंख्या | शेकडाप्रमाण |
|---|---|---|
| शेती [पीककर्ज] | ५ | ४१.६६ |
| पाणीपुरवठा | २ | १६.६६ |
| म्हशीसाठी | ५ | ४१.६६ |
| एकूण | १२ | १००.०० |

कोष्टक क्रमांक ४.२८ मध्ये सन १९९२-९३ मधील थकबाकीचे प्रमाण दर्शविलेले आहे. एकूण थकबाकीमध्ये पीक कर्ज थकबाकीचे प्रमाण ४१.६६, तर म्हैशीसाठीचे दिलेले प्रमाण हे ही तेवढेच आहे. म्हैशी-थकबाकीमधील सर्व सभासद हे अनुसूचीत जाती जमातीचे आहेत.

## सोसायटीकडून मिळणारी इतर मदत

### ४.२६ रॉकेल विभागाकडून मिळणारी सेवा :

या सोसायटीकडून सभासदांना रॉकेल विभागाकडून नियमीत रॉकेलचा पुरवठा केला जातो. प्रत्येक सभासदांच्या कुटुंबाला सरासरी दरमहा [प्रत्येक रेशन कार्डामागे] ५ लिटर रॉकेल मिळते. या विभागाकडून मिळणारे रॉकेल बहुसंख्य सभासदांना पुरेसे होत नाही. या गावात या सोसायटी व्यतिरिक्त इतर कोणत्याही खाजगी किराणा दुकानदाराकडून रॉकेलचा पुरवठा होत नाही. तेंव्हा सभासद पर्यायी इंधन म्हणून जळावू लाकूड, गॅस, इलेक्ट्रीक शेगडी इत्यादींचा वापर करतात. या सोसायटीकडून मिळणारी मदत व त्यावर सभासदांना करावा लागणारा खर्च खालीलप्रमाणे :

कोष्टक पुढील पानावर

कोष्टक कृमांक ४.२९

सभासदांना मिळणारी सेवा

| दरमहा मिळणारी मदत वस्तूस्वरुपात | सरासरी प्रमाणे दरमहा | मासीक खर्च रुपये खर्च दर | | वार्षिक खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| रॉकेल | ५ लिटर | ३रु. | १५रु. | १८० |
| साखर | २.२०० | ९.०५ | १९.९१ | २३८.९२ |
| गहू | ५.४७किलो | ५रु. | २७.३५ | ३२८.२० |
| तांदूळ | ५.४७किलो | ७रु. | ३८.२९ | ४५९.४८ |
| एकूण | | | १००.५५ | १२०६.६० |

सभासद कुटुंबात सरासरी ५.४७ व्यक्ती आहेत, त्यांना दरमहा दरमाणशी साखर ०.४०० ग्रॅकिलो, गहू १ किलो, तांदूळ १कि. इतके मिळते.

४.२७ संस्थेव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून घ्याव्या लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू :

या संस्थेकडून वरील जीवनावश्यक वस्तू व्यतिरिक्त अन्य कोणत्याही जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जात नाही. वरील कोष्टककृमांक ४.२९ मधील जीवनावश्यक वस्तू सभासदांना व त्यांच्या कुटुंबीयांना पुरेशा नसल्यामुळे खाजगी दुकानदारांकडून वस्तूंची खरेदी करावी लागते. सरासरी प्रत्येक सभासद कुटुंबियाला साखर, ज्वारी, तांदूळ, तेल, साबण, चहा यासाठी पुढीलप्रमाणे खर्च करावा लागतो.

## कोष्टक कृमांक ४.३०

संस्था व्यतिरिक्त इतर ठिकाणाहून घ्याव्या लागणा-या जिवनावश्यकवस्तू

| जीवनावश्यक वस्तू | दरमहा प्रमाण | दर रुपये | दरमहा खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| साखर | ५.१६० कि. | १३.०० | ६७.०८ | ८०४.९६ |
| ज्वारी | ३९ कि. | ४.५० | १७५.५० | २१०६.०० |
| गहू | १६.६४ कि. | ५.०० | ८३.२० | ९९८.४० |
| तांदूळ | ११.७२ कि. | ८.५० | ९९.६२ | ११९५.४४ |
| गोडेतेल | ४.५६ | ३५.०० | १५६.६० | १९१५.२० |
| साबण | ६.२८ | ५.०० | ३१.४० | ३७६.८० |
| चहा | १.२३० | ७०.०० | ८६.१० | १०३३.२० |
| एकूण | | | ६९९.५० | ८४३०.00 |

सरासरी सभासद कूटूंबात माणशी ५.४८ व्यक्ती आहेत या कुटूंबातील व्यक्तींना संस्थेकडून मिळणारी मदत पुरेशी नसल्यामुळे या वस्तुवरील मासीक खर्च ६९९.५० रुपये इतके आहे. तर या वस्तुवरील वार्षिक खर्च ८४३०.०० रुपये इतके कोष्टक क्. ४.२९ [ संस्थेकडून मिळणारी सेवा ] शी तुलना केली असता या वस्तुवरील खर्च ७ पटीने जास्त करावी लागते.

### ४.२७ सिमेंट विभाग :

एकूण निवडलेल्या सभासदापेकी केपळ १५% सभासदांनी १९९२-९३ या कालात सोसायटीकडून सिमेंट खरेदी केलेली आहे. तर १९% सभासदांनी अन्यत्र ठिकाणाहून सिमेंट खरेदी केली आहे. तर दोन्ही मार्गांनी ७%

सभासद सिमेंट खरेदी करतात. ज्या १५ टक्के सभासदांनी सोसायटी कडून सिमेंट घेतलेले आहे त्यांचा वार्षिक खर्च खालीलप्रमाणे -

कोष्टक क्रमांक ४.३७

सभासदांचा सिमेंटवरील खर्च
[१९९२-९३]

| स्त्रोत | सभासद संख्या | वार्षिक खरेदी पोती | दर | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| संस्था | १५ | ५४७ | ११० | ५४,७०० |
| अन्यत्र | १९ | २२५८ | ११० | २,४८,३८० |
| दोन्हीकडून | ७ | १३८ | ११० | १५,१८० |
| एकूण | ४१ | २९७४ | ११० | ३,१८,२६० |

वरील कोष्टक क्रमांक ३.३७ मध्ये नमुन्यातील १०० व्यक्तीपैकी फक्त ४१ व्यक्तींनी सिमेंटचा उपभोग केलेला आहे. यामध्ये बाहेरील खाजगी दुकानदाराकडून १९ व्यक्तींनी सिमेंट खरेदी केलेले आहे. त्याचा सिमेंटवरील वार्षिक खर्च २,४८,३८०/- रुपये इतका झालेला आहे. याचाच अर्थ स्वत:चे इमारत बांधकामासाठी मोठ्या डिलरकडून पुरेसे व चांगल्या कंपनीचे सिमेंट व्यक्ती खरेदी करीत असतात.

४.२८ **कापड विभाग :**

एकूण निवडलेल्या सभासदापैकी १७ टक्के सभासद हे या संस्थेकडून कापड खरेदी करतात याशिवाय हे सभासद या संस्थेव्यतिरिक्त बाहेरील खाजगी दुकानदाराकडून खरेदी करतात. उरलेले सभासद हे फक्त

खाजगी कापड दुकानदाराकडूनच कापडाची खरेदी करतात.

कोष्टक क्रमांक ४.३९

कापड खरेदी करणा-या सभासदाचा वार्षिक खर्च

| मार्ग | पुरुष संख्या | स्त्री संख्या | एकुण वार्षिक खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| संस्थेकडून व खाजगी व्यापा-याकडून | ६४ | ५७ | २४७३५० |
| फक्त खाजगी व्यापा-याकडून | ३६ | ४३ | ९५७०० |
| एकूण | १०० | १०० | ३४३०५० |

कोष्टकावरुन असे म्हणता येते की, एकूण सभासदापैकी संस्थेकडून कापड खरेदी करणा-या सभासदांची संख्या कमी आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे हे गांव सांगली जिल्ह्यालगतच असल्या-मुळे बहुतेक सभासद सांगलीच्या कापड बाजारपेठामधूनच खरेदी करतात. ही संस्था लाभांश देते. यामधील काही सभासद लाभांश रोख स्वरुपात न घेता कापडाच्या स्वरुपात घेतात.

## ४.२९ खत विभाग :

ही संस्था शेती व शेतीशी निगडीत असलेल्या उधोगात गुंतली आहे. या गावातील १०० टक्के शेतजमीन ही बागायत असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता असते. या

संस्थेकडून युरिया, सुफला, सुपर फॉस्फेट, डीएपी, संपुर्णा, पोटॅश, इत्यादी खतांचा पुरवठा केला जातो. संस्थेचे सभासद हे संस्थेकडून आणि गावातील खाजगी ४त दुकानदाराकडून रासायनिक खतांची खरेदी करतात. खालील कोष्टकात सभासदांनी १९९२-९३ या सालात खाजगी आणि संस्थेकडून खरेदी केलेल्या खतांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ४.३३

रासायनिक खते खरेदी करणा-या सभासदाचे वर्गीकरण

| मार्ग | एकूण वार्षिक खर्च [रुपये] | सभासद संख्या |
| --- | --- | --- |
| संस्थेकडून | ८६,२०० | ९ |
| खाजगी दुकानदाराकडून | ८,२६,४०० | ५० |
| दोन्ही मार्गानी | ९,२४,२०० | ३९ |
| एकूण | १८,३६,८४० | ९४ |

कोष्टक क्रमांक ४.३२ मध्ये निवडलेल्या १०० सभासदांची एका वर्षामधील [१९९२-९३] खताचा खर्च दर्शवितो. एकूण सभासदापैकी ९८ सभासद खत खरेदी करतात, एकूण सभासदापैकी गावातील खाजगी दुकानदाराकडून रा. खते खरेदी करणा-या सभासदांची संख्या अधिक आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे गावातील दोन खाजगी दुकानदार हे झुआरी अॅग्रो व आर.सी.एफ.

या नामवंत कंपन्यांचे एजंट आहेत. संस्थेच्या रासायनिक खतांच्या दरापेक्षा या एजंटस् कडील खतांचे दर कमी आहेत. शिवाय हे खाजगी दुकानदार उधार उसनवारीवर खताचा पुरवठा करतात. त्यामुळे संस्थेकडून खत घेतल्यानंतर द्यावेलागणारे व्याज या दुकानदारांना द्यावे लागत नाही. सभासदांना या एजंटांकडून आवश्यकता भासेल तेंव्हा ताबडतोब व पुरेसा खताचा पुरवठा केला जातो. या संस्थेकडून पीक तारण कर्जावर रासायनिक खतांचा पुरवठा केला जातो.

४.३० **औषधे व शेती औजारे विभाग :**

या संस्थेच्या स्थापनेपासून १९५७ या सालापर्यन्त कोणत्याही प्रकारे शेती औजारे व औषधांचा पुरवठा सभासदांना केला जात नव्हता यानंतर मात्र सभासदांची औषधे व शेती औजारे यांची वाढती मागणी लक्षात घेऊन संस्थेने १९५७ या सालापासून सभासदांना शेती औजारे भाडे तत्वावर तर औषधे रोख स्वरुपात पुरवठा करण्याचे ठरविले. १९९० सालापासून नांद्रे गांव संपूर्ण बागायत झाल्याने सभासदांची उसासारखी नगदी पीके घेण्याची प्रवृत्ती वाढली. त्यामुळे शेती औजारे व औषधे यांना अजिबात मागणी न आल्याने हा विभाग पूर्णपणे बंद करण्यात आला.

या संस्थेने सभासदांना अत्याधुनिक यंत्रांच्या सहाय्याने शेती मशागतीसाठी १९६७ मध्ये ट्रॅक्टर खरेदी केले. पण ट्रॅक्टरचा अयोग्य वापर व वाढता डीज खर्च यामुळे ट्रॅक्टरमध्ये केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरली नाही. म्हणून हा ट्रॅक्टर १९७०, साली विकण्यात आला.

## प्रकरण - पांचवे

## निष्कर्ष आणि शिफारसी

### ५·१ : प्रास्ताविक व अभ्यासपध्दती :

या प्रकरणामध्ये प्रबंधा विषयी प्रास्ताविक माहिती देवून अभ्यासपध्दतीची समग्र चर्चा केलेली आहे· नांद्रेयेथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अभ्यासा विषयाची माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, पहाणी इत्यादी संशोधन तंत्राचा वापर केलेला आहे· यामध्ये सभासदांच्या शेती विकासा विषयाची उद्दिष्टे, समस्याचे स्वरूप, यासाठी प्रश्नावली तयार करून संशोधनाची मांडणी केलेली आहे· अभ्यास पध्दती व अभ्यासाची मांडणी कशी असावी या गोष्टीकडे लक्ष देण्यात आलेले आहे·

या संशोधनासाठी १०० मुलाखती नमुना पध्दतीने निवडलेले आहे· गांवातील विविध जातीतील सभासदाचा विचार करून संशोधना साठी सर्वांचा समावेश केलेला आहे·

संशोधनासाठी लागणारी दुय्यम आकडेवारी या संस्थेच्या वार्षिक ताळेबंद व संस्थेच्या सत्य कागदपत्रावरून मिळविलेले आहे· तसेच काही दुय्यम आकडेवारी, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, ग्रामपंचायत, सहकारी संस्था जनगणना कार्यालय, यांचेकडून मिळविले आहे·

### ५·२ : सहकाराची तत्वे उगम आणि विकास :

या प्रकरणामध्ये सहकाराचा उगम, सहकाराची व्याख्या, व्याप्ती आणि चळवळीची मुलतत्वे कोणती आहेत याचा परामर्श घेतला आहे· सन १८४४ मध्ये रॅाशडेल पायोनिअर्स·थासून सहकार चळवळीचा उगम झाला·

भारतासारख्या कृषी प्रधान देशामध्ये सहकार चळवळीतून

मिळालेले योगदान अत्यंत उपयुक्त ठरलेले आहे. सरकाराच्या सर्व व्याख्येवरून असे म्हणाता येईल की एकाकी दुर्बळ व्यक्तीनी इतराशी सहकार्य करुन भौतीक लाभ प्राप्त करून घेणारी विकास संस्था म्हणजे सहकार होय.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये सहकार चळवळ सुरु होऊन आज ९० वर्षे पुर्ण झाली. भारतातील सहकार चळवळींचा तुलनात्मक अभ्यास केला तर स्वातंत्र्यपुर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील सहकार चळवळीचा विचार करावा लागेल, या तुलनात्मक अभ्यासाकडेही लक्ष दिलेले आहे. या चळवळीच्या तुलनात्मक विकासासाठी काही व्यक्तींच तरकही सहकार मंडळाचे ही योगदान लाभलेले आहे. याकडे लक्ष देण्यात आलेला आहे.

भारतातील सहकार चळवळीची रचना ही विचारात घेतली आहे. महाराष्ट्रात या चळवळीत अग्रक्रम देण्यात आलेला आहे. विशेषत: महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात सहकार चळवळ खोलवर रुजलेले आहे हे या प्रकरणातून सांगण्यात आलेला आहे.

कोष्टक क्रमांक २.१ व २.२ मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकार संस्थांची प्रगती दर्शविते. १९२८-२९ ते १९४७ पर्यंत सभासद संख्येत ३० पट वाढ झालेली आहे. तर खेळते भांडवलामध्ये ५ पट वाढ झालेली आहे.

कोष्टक क्र.२.३ मध्ये निरनिराळ्या राज्यातील प्राथमिक सहकार संस्थेची आकडेवारी दाखविलेली आहे. १९६०-६१ ते १९८०-८१ पर्यंत महाराष्ट्र राज्य वगळता सर्व राज्यामध्ये सहकार संस्थेची आकडेवारी घटलेली आहे. तर महाराष्ट्रात या संस्थाची संख्या दुप्पट झालेली आहे. तर उत्तरप्रदेशात या राज्यामध्ये ५ पट झालेली आहे.

कोष्टक क्रमांक २·४ मध्ये १९८०-८१ ते १९९०-९२ पर्यंत प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेतील सभासद संख्या दाखविलेली आहे· गुजराथ राज्यामध्ये निमपट झाली आहे· तर बाकी सर्व राज्यामध्ये चळवळीची फारशी वाढ झालेली नाही·

कोष्टक क्रमांक २·५ मध्ये महाराष्ट्रातील सहकार सोसायटयांची आकडेवारी दिलेली आहे· यामध्ये पुणे प्रांतीक विभागात इतर विभागापेक्षा सहकारी संस्थेचे जाळे पसरलेले आहे·

५·३ : नांद्रे येथील विविध कार्यकारी संस्थेचा इतिहास पार्श्वभूमी आणि विकास (१९१६ ते १९९३) :

या प्रकरणात सुरवातीला नांद्रे गावाचा परिचय थोडक्यात सांगीतलेला आहे· यामध्ये नांद्रे गावाचे भौगोलिक स्थान, जमिनीचा उपयोग, हवामान, लोकसंख्या, पीकाची पध्दती, जलसिंचन सोयी, आणि इतर सहकार व सामाजिक संस्था या गोष्टी विचारात घेतलेल्या आहेत· १९६१ ते १९७१ या कालावधीमध्ये लोकसंख्येत वाढ झालेली आहे· पण या वाढीचा वेग कमी आहे· १९९१ च्या जणगणनेनुसार नांद्रे गांवच्या एकूण लोकसंख्येत पुरुषाचे प्रमाण ५०·८८ तर स्त्रीयांचे प्रमाण ४९·२२ इतके आहे·

कोष्टक क्रमांक ३·३ मध्ये जलसिंचन सोयी बाबतचे विश्लेषण सांगीतलेले आहे· गावातील ९० टक्के भूमी जलसिंचनानी व्यापलेली आहे· याचेकारण म्हणजे गांवापासून जवळच असणा-या कृष्णानदीतून पाण्याचा उपसाकरुन संपुर्ण शेतीला पाणीपुरवठा केला जात आहे·

नांद्रे विविध कार्यकारी सहकार संस्थेच्या विकासाविषयी अवलोकन करीत असताना सुरुवातीला या संस्थेच्या स्थापणेची कारण दिलेले आहे· गांवामध्ये सावकारी पध्दतीने कर्ज पुरवठा केला जात होता· त्याचे प्रमाण जवळ जवळ ६० टक्के इतके होते· म्हणून सभासदाना

यापासून मुक्त करण्यासाठी १९१७ मध्ये परस्पर सहकार मंडळ नांद्रे या सहकारी संस्थेची स्थापना केली.

या प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील या संस्थेच्या प्रगती बाबतची कल्पना दिलेली आहे.

१९१६ ते १९४७ पर्यंत या संस्थेची प्रगती फारशी झालेली नाही. कारण लोकांचा सहकार संस्थेवर विश्वास नव्हता. भाग भांडवलाचे प्रमाण कमी होते, सावकारी कर्ज पुरवठा अधिक, होता. व संस्थेला मिळणाऱ्या ठेवीचे प्रमाणाही फारच कमी होते.

कोष्टक क्रमांक ३.१० मध्ये १९४७ ते १९६० या कालावधीमधील संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतलेला आहे. या १३ वर्षीच्या कालावधी मध्ये सभासद संख्येत तिपटीने भाग भांडवलात २१ पटीने वाढ झालेली आहे. तर संस्थेच्या नफ्यामध्ये ७५ रूपयावरून ५६२८ रूपयापर्यंत वाढ झालेली आहे.

१९६१ ते १९७० या कालावधीमधील संस्थेची घोडदौड कोष्टक क्रमांक ३.११ दर्शविते. सातत्याने "अ" हा ऑडीट वर्ग मिळालेला आहे. शेअर्स भांडवलामध्ये दुपटीपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. तर ठेवीमध्ये सातत्याने चढउतार होत आहेत. कर्जवाटप पध्दतीमध्ये साधे कर्ज, म.मुदत कर्ज, तारण कर्ज यामध्ये दीडपट वाढ झालेली आहे.

कोष्टक क्रमांक ३.१२ मध्ये सन १९६६ ते ६९ मध्ये या संस्थेनी केलेली गुंतवणूक दोडपट वाढ झालेली आहे.

सभासद रासायनिक खते, मासळी खते, शेती अवजारे, इत्यादी वस्तूंची खरेदी या संस्थेकडून करतात, कोष्टक क्र.३.१६ मध्ये १९६२ च्या तुलनेने रासायनीक खतामध्ये १९७० पर्यंत ७ पटीनी वाढ झालेली आहे.

सन १९६३ मध्ये संस्थेच्या इतिहासात पहिल्यादाच सभासदांना कर्ज देण्याकरीता बॅंकाकडून कर्ज घेतले त्याचे प्रमाण पुढे वाढत गेलेले आहे.

कोष्टक क्रमांक ३·१८ मध्ये १९६१ ते १९७० या कालावधीमधील खेळत्या भांडवलाचे प्रमाण दाखविलेले आहे· त्यामध्ये ८ पटीने वाढ झालेली आहे·

कोष्टक क्रमांक ३·१९ मध्ये १९७१ ते ८० या कालावधीमधील संस्थेची प्रगती दर्शविते· यामध्ये शेअर्स भांडवल कर्जवाटप यामध्ये फारशी वाढ झालेली नाही· व शेती उपयोगी वस्तूंचा पुरवठा व जिवनावश्यक वस्तूंच्या पुरवठा मध्ये दुप्पट वाढ झालेली आहे·

ही संस्था धान्य, रॉकेल, कापड या जिवनावश्यक वस्तूंची विक्री करते·१९७२ ते १९८० या कालावधीमध्ये दुप्पट वाढ झालेली आहे· हे कोष्टक क्रमांक ३·२३ वरून सांगीतलेली आहे·

कोष्टक क्रमांक ३·२५ मध्ये १९८१ ते १९९३ मधील या संस्थेची प्रगती दाखविलेली आहे· १९६१ ते १९९१ पर्यंत लोकसंख्यात वाढ झालेली आहे· गांवाचे भौगोलिक क्षेत्र २७७४·६२ हेक्टर आहे· १९८० ते १९९३ पर्यंत सभासद संख्येत ७६७ ने वाढ झालेली आहे· याचे कारण म्हणजे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेकडून या संस्थेमार्फत विकास पाणी पुरवठा संस्थेला अर्थसहाय्य दिलेला आहे·

कोष्टक क्रमांक ३·२७मध्ये १९९३ अखेरपर्यंत संस्थेचे शेअर्स भांडवल दाखविले आहे· १९८१ ते १९९३ पर्यंत ३ पट वाढ झालेली आहे·

ही संस्था सभासदाना अल्पमुदत व मध्यम मुदत कर्ज पुरवठा करते· अल्पमुदत कर्ज प्रकरणामध्ये ज्याची शेती ५ एकरापेक्षा कमी आहे· अशा सभासदांना साधे कमकुवत कर्ज व ऊस कमकुवत कर्ज देते· आणि ज्याची शेती ५ एकरापेक्षा जास्त आहे अशा सभासदांना साधे सदन कर्ज व ऊसधारक कर्ज पुरवठा करते· ऊससधन कर्जपुरवठामध्ये ४ पटीने तर ऊस कमकुवत कर्ज प्रकरणामध्ये २ पटीने वाढ झालेली आहे· हे कोष्टक क्रमांक ३·३० वरून सांगता येते· याची कारणे म्हणजे बागायत शेती प्रमाण वाढलेले आहे·

१९९१ मध्ये संस्थेच्या इतिहासात पहिल्यादाच दिर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. १९९३ पर्यंत १२,९४४-१५ रुपयाचा कर्ज पुरवठा केलेला आहे. याचे कारण म्हणजे पाणी पुरवठा संस्थेसाठी १५ टक्के व्याजदरानी कर्ज पुरवठा केलेला आहे.

रॉकेल, कापड, धान्य या जीवनावश्यक वस्तूंची विक्री करते. कोष्टक क्रमांक ३.३५ ते ३.३७ मध्ये या वस्तूच्या विक्रीचे प्रमाण दर्शविले आहे. १९९१ ते १९९३ पर्यंत या वस्तूच्या विक्रीचे प्रमाण कमी झाले आहे. कारण वस्तूची प्रत कमी आहे, अपुरापुरवठा, सांगली लगतची बाजारपेठ नाही. बाहेरील किमतीशी फारसा फरक नाही.

कोष्टक क्रमांक ३.४० मध्ये १९८५ ते ९९३ पर्यंत संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण दाखविले आहे. कर्ज वाटपाच्या प्रमाणाशी टक्केवारी काढली असता ९० टक्के कर्ज वसूली होते कारण संस्था साखर कारखान्याकडून पीकाच्या बीलापोटी रक्कम गोळा करते.

५.४ : या प्रकरणामध्ये नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेकडून सभासदांना ज्या कांही सेवा मिळतात त्याचे मुल्यमापन करण्यात आलेले आहे. यासाठी सन १९९२-९३ हे वर्ष घेतलेले आहे. सन १९९२-९३ या वर्षी मधील नमुना पध्दतीने सभासद निवडून १०० सभासदाची मुलाखती घेतल्या.

कोष्टक क्रमांक ४.१ मध्ये सभासदाचे वयोमानानुसार वर्गीकरण दाखविले आहे. ४१ ते ६० वयोगटातील सभासदांची संख्या ६० टक्के इतकी आहे. याचा अर्थ दीर्घ अनुभव असणाऱ्या सभासदाची संख्या जास्त आहे.

नांद्रे बावरसवाडी या दोन गावातील व्यक्ती या संस्थेचे सभासद आहेत. नांद्रे गावाची लोकसंख्या जास्त आहे आणि शेत-जमिनीचे आकारमान ही अधिक आहे. त्यामुळे नांद्रे गावाची सभासद संख्या जास्त आहे. हे कोष्टक क्रमांक ४.२ मध्ये दाखविले आहे.

कर्ज घेतलेल्या रक्कमामधून ५ टक्के रक्कम शेअर्स पोटी वजा केली जाते. नमुन्यातील १०० सभासदापैकी २००० रुपये पर्यंत शेअर्स असणाऱ्या सभासदाची संख्या ७१ टक्के इतके आहे.

कोष्टक क्रमांक ४.८ मध्ये नमुना निवडतील अनुसुचीत जाती जमातीचे व इतर वर्गीय सभासदाचे वर्गीकरण केलेले आहे. यामध्ये महार ५ टक्के मांग,२ टक्के, चांभार २ टक्के, रामोशी १ टक्का धनगर ५ टक्के, तेली १ टक्के, न्हावी १ टक्के असे १७ टक्के सभासद हे अनुसुचीत जाती जमातीचे आहेत. इतर वर्गामधील सभासद ८३ टक्के आहेत. कारण या वर्गातील लोकसंख्येचे प्रमाण व शेतीचे आकारमान अधिक आहे.

कोष्टक क्रमांक ४.११ मध्ये सभासद कुटूंबातील आकारमाना नुसार वर्गीकरण केलेले आहे. यावरुन असे सांगतायेईल की एका कुटुंबामध्ये ५.४७ व्यक्ती एका कुटूंबामध्ये आहेत.

नमुन्यातील १०० सभासद हे बागायत शेती करणारे शेतकरी आहेत. यामध्ये १ ते ५ एकर जमीन असणाऱ्या सभासदाची संख्या ५५ टक्के इतकी आहे.

सभासद ऊस, सोयाबीन व गव्हाचे या पीकाचे उत्पादन करतात. एकूण सभासदापैकी ६२ टक्के सभासद हे १ ते ३ एकरापर्यंत ऊसाचे उत्पादन करतात. सोयाबीन व गव्हाच्या क्षेत्रानुसार वर्गीकरण केले असता. १ ते ३ एकर सोयाबीन असणाऱ्या सभासदाची संख्या ५७.४० टक्के तर गव्हाचे ५३.३३ टक्के इतके आहे.

नमुन्यातील १०० सभासदांपैकी फक्त २० एकर क्षेत्रामध्ये शाळूचे उत्पादन व २४ एकर क्षेत्रामध्ये हरभरा हे पिक घेतलेले आहे. कारण हवामानात होणारा बदल, ऊसाचे उत्पादन अधिक, उत्पादन कमी इत्यादी गोष्टी कारणीभूत आहेत.

कोष्टक क्रमांक ३.१६ मध्ये निवडलेल्या सभासदांच्या बागायत शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्च वजा करून नफा काढलेले आहे. ३ ते ५ एकर जमीन असणाऱ्या सभासदांची संख्या जास्त असल्यामुळे या क्षेत्रापैकी कांही क्षेत्र ऊसाचे क्षेत्र व काही क्षेत्र सोयाबीनचे क्षेत्र असते. यामुळे ५०,००० रूपयापर्यंत या पीकावरील खर्च करणाऱ्या सभासदांची संख्या ७४ टक्के इतकी आहे. तर २५००० रूपयापर्यंत खर्च करणाऱ्या सभासदाची संख्या ५१.१२ टक्के आहे. तर या पीकातून १ लाख रूपया पर्यंत नफा मिळणाऱ्या सभासदांची संख्या ७७.२६ इतकी आहे.

निवडलेल्या सभासदांपैकी ३स सभासदांना जिराईत पिकातून तोटा झालेला आहे.

सभासद शेती पुरक व्यवसाय म्हणून दुधाचाव्यवसाय करतात. सभासद म्हैस व गाय याचे पालन करणाऱ्या सभासदांची संख्या अधिक आहे. दोन म्हशी पर्यंत पालन करणाऱ्या सभासदांची संख्या ६२ इतकी आहे.

कोष्टक क्रमांक ४.२९ मध्ये पशुपालन व्यवसायातून सभासदांना मिळणाऱ्या नफा तोट्याचे प्रमाण दाखविलेले आहे. पशुपालन व्यवसायातून १०,००० रूपयापर्यंत तोटा असणाऱ्या सभासदाची संख्या ५८.३३ इतके आहे. म्हणजेच तोट्याचे प्रमाण अधिक आहे. कारण यातून बारमाही उत्पन्न मिळत नाही. सभासदाचे श्रम आणि शेतीतून मिळणारा चारा वजा केलेला आहे.

नमुन्यातील १०० सभासदांपैकी फक्त ५ टक्के स्त्री सभासद आहेत. या स्त्रीयांना पतींच्या निधनामुळे सभासद व्हावे लागलेले आहे.

नांद्रे गांवामध्ये १२ जलसिंचन सहकारी संस्था आहेत. यापैकी ४ संस्था कर्जमुक्त झाले आहेत. या पाणीपुरवठा संस्थेला भूविकास बँक सांगली व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सांगली कडून कर्ज पुरवठा झाला आहे.

९४ टक्के सभासद हे कर्ज मिळण्यासाठी या संस्थेचे सभासद झालेले आहेत.

संस्थेकडून कर्ज घेतलेल्या सभासदांपैकी ९२.५ टक्के सभासद हे पीक कर्ज, शेती अवजारे खरेदी व पाणी पुरवठा साठी कर्जघेतलेले आहेत. तर ७.९५ टक्के सभासद हे म्हैस खरेदीसाठी कर्ज घेतलेले आहेत.

कोष्टक क्रमांक ४.२५ मध्ये सभासदानी या संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे प्रमाण दाखविलेले आहे. ४०,००० रूपयापर्यंत कर्ज घेतलेल्या सभासदाची संख्या ७७.७६ टक्के इतकी आहे.

कोष्टक क्रमांक ४.२६ मध्ये कर्ज प्रकारानुसार वर्गीकरण केलेले आहे. अल्पमुदत कर्ज प्रकार म्हणजेच पीक कर्जासाठी ६३.९४ टक्के मध्यम मुदत साठी १२.६९ टक्के तर दीर्घ मुदतीमध्ये २३.८० टक्के कर्ज घेतलेले आहेत.

निवडलेल्या सभासदांपैकी ८८ टक्के सभासद हे इतर बँक व पतसंस्था कडून कर्ज घेतात.

निवडलेल्या सभासदापैकी १२ सभासदाकडून थकबाकीचे रक्कम वसूल झालेली नाही. यापैकी ५ सभासद हे अनुसुचीत जाती जमातीचे आहेत.

कोष्टक क्रमांक ४·२९ मध्ये संस्थेकडून मिळणाऱ्या सेवाचा उल्लेख केलेला आहे· सभासद कुटूंबात सरासरी ५·४७ व्यक्ती राहतात· सभासद वार्षिक सरासरी १२०६·६० रुपयाच्या वस्तू या संस्थेकडून खरेदी करीत असतात· हे प्रमाण कमी असण्याचे कारण म्हणजे दरमहा मासीक दरडोई काही प्रमाणातच वस्तू खरेदी करता येते·

कोष्टक क्रमांक ४·३० मध्ये सभासद या संस्थेशिवाय बाहेरील दुकानदाराकडून जिवनावश्यक वस्तू खरेदी करीत असतात· सभासदाचा या वस्तूवरील वार्षिक खर्च ८४३० रुपये आहे·

निवडलेल्या १०० सभासदापैकी ४१ सभासदानी सिमेंट खरेदी केले आहेत· यापैकी १९ सभासद हे बाहेरील दुकानदाराकडून सिमेंट खरेदी केलेले आहेत· हे प्रमाण अधिक असण्याऱ्याचे कारण म्हणजे पुरेसे व चांगल्या कंपनीचे सिमेंट या संस्थेकडून मिळत नाही· तसेच सिमेंटच्या किमतीमध्येही फरक नाही·निवडलेल्या सभासदापैकी फक्त १७ सभासद या संस्थेतून कापड खरेदी केलेले आहेत· संस्था व खाजगी व्यापाराकडून कापड खरेदी करणाऱ्या सभासदाची संख्या ६४ टक्के इतके आहे· तर खाजगी व्यापाराकडून कापड खरेदी करणाऱ्या सभासदाची संख्या ३६ टक्के इतके आहे·

कोष्टक क्रमांक ४·३२ मध्ये रासायनिक खते खरेदी करणाऱ्या सभासदाचे वर्गीकरण दिलेले आहे· यामध्ये सन १९९२-९३ मधील खतावरील खर्च दाखविले आहे· निवडलेल्या सभासदांपैकी फक्त ९ सभासद हे या संस्थेकडूनच खते खरेदी केलेले आहेत· ५०सभासद हे खाजगी दुकानदारककडून खरेदी केलेले आहेत· बाहेरील खते खरेदी करणाऱ्या सभासदाची संख्या जास्त आहे· कारण दोन नामवंत कंपनीचे एजंट आहेत· किमतीमध्ये बदल नाही· अपुरापुरवठा, इत्यादी गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील·

## शि फा र शी

१) प्राथमिक पतपुरवठा संस्था लहान व सिमांत शेतक-यांचा आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला नाही. यासाठी शेती पुरक उद्योग स्थापन करुन त्यामध्ये लहान व सिमांत शेतक-यांना सहभाग घ्यावे.

२) प्राथमिक पतपुरवठा संस्थेच्या संलग्न पाणीपुरवठा संस्था निर्माण झाल्या पाहीजेत.

३) शेती पतपुरवठा संस्था यशस्वी चालण्यासाठी सभासदांच्या शेती मध्ये नगदी पिकांचा हिस्सा मोठा असला पाहीजे. यासाठी नगदी पिकाची बियाणे खरेदी करुन पुरवणे, या पीका बाबतचे शंका सोडवणे, संशोधन संस्था स्थापन परिषदभरविणे इत्यादी कार्य या संस्थानी कराव्यात

४) सरकारचे धोरण अशा प्रकारचे पाहिजे की शेती विकासामधील २० टक्के रक्कम शेती संशोधनासाठी खर्च करावे.

५) अशा संस्थेची कर्जवसूली चांगली होण्यासाठी व थकबाकीचे प्रमाणे अल्प राहण्यासाठी संस्थेच्या सभासदाचे शेती उत्पादन नियमीत पणे वाजवी किमतीस विकले जाण्याची सोयअसणे आवश्यक आहे. या विचाराशी संस्थापक पातळीवर कर्ज वसूलीचा सांगड असली पाहिजे.

६) सहकार संस्थेच्या विकासासाठी योग्य राजकीय नेतृत्व, सहकार शिक्षण, व्यवस्थापन, नविन तंत्रज्ञान व संशोधन या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

७) संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये दिर्घकाळ टिकणारे नेतृत्व सातत्यानी मिळण्याची आवश्यकता आहे. बदलत्या परीस्थितीचा विचार करुन सभासदांच्या मागणीची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच तोट्यात येणारे सर्व व्यवहार बंद करण्याचे धाडस संस्थेच्या व्यवस्थापनात असावे.

८) संस्थेच्या आर्थिक प्रश्नाकडे लक्ष देवून ते सोडवण्याचा प्रयत्न संस्थात्मक पातळीवर करणे तसेच थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी जुन्या कर्जासाठी नविन कर्ज देवून ते कमी करण्यात यावे.

९) सभासदाला संस्थेने अधिक सेवा योग्य दरात पुरविण्याचा प्रयत्न करणे.

१०) आर्थिक दृष्टया स्वयंपुर्णता प्राप्त करण्यासाठी ठेवीच्या व भागाच्या माध्यमातून भांडवल गोळा करण्याचा प्रयत्न करणे.

११) स्थानिक पातळीवर सहकार शिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणे.

//////